नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 09/09/2020 (बुधवार)
(सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 300 मी. अंतरावर मौजा बुटीबोरी येथे दिनांक 06/09/2020 ते दिनांक 07/09/2020 चे रात्री दरम्यान फिर्यादी नामे– मनोहर भिमराव पुडंकर, वय 64 वर्ष, रा. श्रीकृष्ण नगर वर्धमान नगर बुटीबोरी यांच्या गोडाउनचे दुकानाचे छतावरुन अज्ञात आरोपीने टिन तोडून गोडाउनचे आत प्रवेश केले. यानंतर आरोपीने कोणत्यातरी वस्तूने गोडाउनच्या आत ठेवलेल्या टेबलचे ड्रॉपचे लॉक तोडून ड्रॉप मध्ये ठेवलेले चिल्लर पैसे 3,000/– रू व त्याचे मालकाचे कॅबीनमध्ये असलेली आलमारीचे लॉक तोडून आलमारीत ठेवलेले नगदी 15,000/– रू असा एकूण 18,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 461, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा नांदुरकर 9923242587 हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 01 कि. मी अंतरावर जलालखेडा वार्ड क्र. 5 ता. नरखेड येथे दिनांक 07/09/2020 चे 11:45 वा. दरम्यान फिर्यादी नामे– नरेन्द्र सिताराम नाडेकर, वय 32 वर्ष, रा. जलालखेडा वार्ड नं 5 ता. नरखेड हा घरी हजर असतांना त्यांना घराबाहेर झगडयाचा आवाज आल्याने ते घराबाहेर आले असता आरोपी 1) गोपाल आनंदराव सातपुते व 2) गं.भा. अजंनाबाई आनंदराव सातपुते दोन्ही रा. जलालखेडा वार्ड नं 5 ता. नरखेड व त्यांची पत्नी सोनु सातपुते यांचे पती पत्नीचे भाडंण सुरु असल्याचे दिसले. त्यावरून फिर्यादी हा त्यांचा झगडा पाहुन आपल्या घराबाहेर आला तेव्हा आरोपी क्रं 1 हा फिर्यादीचे घरी आला त्यावेळी त्याच्या हातात बांबुची काडी होती व तो म्हणाला की, 'तु मला व माझ्या पत्नीला का पाहतो आणि तु माझ्या घरामध्ये घुसतो' या कारणावरुन आरोपी क्रं 1 यांने फिर्यादीला बांबूची काडीने मारुन जखमी केले त्यामुळे फिर्यादीच्या डोक्यावर व डाव्या हाताचे ढोपरा जवळ मुका मार लागून डोक्यातुन रक्त निघाले आहे. तसेच आ.क्र. 2 हिने सुदधा मारझोड केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 452, 325, 324, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक रंजीत रोकडे 7796120320 हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

1) पो.स्टे. कन्हान – दिनांक 07/09/2020 चे 14.00 वा. ते 14.30 वा. चे सुमारास पो.स्टे. कन्हान हद्दीत फिर्यादी यांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी ही भाजीपाला आणायला जातो असे म्हणुन घरून निघुन गेली ती घरी परत न आल्याने तिचा शोध नातेवाईकडे घेतला असता ती मिळुन आली नाही. सत्रापुर येथील आरोपी नामे– अक्की उर्फ कल्लु किशोर पात्रे, वय 32 वर्ष, रा. कन्हान याने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस हवा रवी चौधरी 7998308932 हे करीत आहे.

2) पो.स्टे. बोरी – दिनांक 06/09/2020 चे 13.00 वा. चे सुमारास पो.स्टे. बोरी हद्दीत फिर्यादी यांची 15 वर्षीय अल्पवयीन मुलगी हिला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक आरती उघडे 8355947473 या करीत आहे.

. अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 05 कि.मी. अंतरावरील मौजा दहेगाव येथे दि. 21/08/2020 चे 22:00 वा. ते 23.00 वा. दरम्यान प्रविन महिपालसिंग चव्हान(मृतक), वय 36 वर्ष, रा. प्लॉट नं 59/बी नेताजी नगर प्रथमेश किराणा स्टोर्स जवळ पो.स्टे पारडी नागपूर हा त्याचे ताब्यातील मोटरसायकल क्र एमएच–49/एस–7527 नी सावनेर कडुन नागपुर कडे जात असतांना त्याला कोणीतरी अज्ञात वाहन चालकांनी पाठी मागुन येवून धडक दिली. या अपघातात मृतक हा जखमी झाला त्याचे डोक्यावर व चेहऱ्यावर जबर मार लागल्याने त्याला उपचाराकरीता मेडीकल कॉलेज नागपूर येथे दि 22/08/2020 रोजी भर्ती केले असता डॉक्टरांनी दि 22/08/2020 चे 01/25 वा. तपासुन मृत घोषीत केले. फिर्यादीचे बयान व मेडीकल कॉलेज नागपूर येथुन मृतकाचे मरण्याबाबत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदरचा गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राजेंद्र रामभगतसिंग चव्हान वय 43 वर्ष रा. वेकेंटेश नगर नंदनवन, नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134/177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा सुर्यभान जळते 9673837007 हे करीत आहे.

2) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 03 कि.मी. अंतरावरील नागपूर वर्धा जाणाऱ्या बायपास उड्डान पुल वळण वरील रोड येथे दि. 08/09/2020 चे 13:00 वा. दरम्यान एमएच– 40/एन– 8471 क्रमांकाचे एसटी बस चा चालक आरोपी याने त्याच्या ताब्यातील एसटी बस भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन एमएच– 40/बीव्ही– 3612 क्रमांकाच्या मोटरसायकाच्या अनोळखी चालकास धडक दिली. या अपघातात अनोळखी चालक हा गंभीर जखमी झाल्याने त्याला उपचाराकामी माया हॉस्पीटल बोरी येथे नेले असता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– पुरूषोत्तम निळकंठ कोलते, वय 55 वर्ष, रा. रूईखैरी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि लगड 9834176423 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर